माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन, पदवी परीक्षा,
स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांकरिता व प्राध्यापक,
मार्गदर्शकांसाठी उपयोगी संदर्भ संपन्न
मराठी व्याकरण पुस्तक

# मराठी व्याकरण


**प्रा. डॉ. के. पी. शहा**

एम्. ए. (हिंदी), एम्. ए. (मराठी)
एम्. ए. (इतिहास, समाजशास्त्र)
पीएच्. डी. (हिंदी), साहित्यरत्न (प्रयाग)



**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर

**मराठी व्याकरण : Marathi Vyakaran**
प्रा. डॉ. के. पी. शहा

**© सौ. हिमा के. शहा**
'हिमाली' ७३ अंबाई डिफेन्स सोसायटी,
प्रतिभानगरजवळ,
कोल्हापूर - ४१६ ००८.

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान हॉस्पिटल जवळ,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मो : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
१८०/-

# अनुक्रमणिका

१. भाषेचा जन्म, लिपी........................................... ७
२. वर्णविचार .................................................. १०
३. लिंगविचार ................................................ १६
४. वचनविचार ................................................ २१
५. काळविचार ................................................ २६
६. संधी व संधिनियम .......................................... ३२
७. प्रयोग....................................................... ४२
८. समास...................................................... ४८
९. विभक्ती..................................................... ५७
१०. शद्बांच्या जाती .............................................. ६२
११. व्याकरण चालविणे........................................... ७५
१२. वाक्यसंयोजन ............................................... ७९
१३. अलंकार .................................................... ८७
१४. वृत्ते ......................................................... ९५
१५. विरामचिन्हे .................................................. ११२
१६. शुद्ध लेखन.................................................. ११६
१७. शद्बसमूहाबद्दल एक शद्ब ...................................... १३८
१८. समानार्थी शद्ब ................................................ १४३
१९. विरूद्धार्थी शद्ब................................................ १४९
२०. जोडशद्ब, एकाच शद्बाचे अनेक अर्थ, समूहदर्शक शद्ब,
अलंकारिक शद्ब, संख्यावाचक शद्ब, पिल्लूदर्शक शद्ब,
घरदर्शक शद्ब, ध्वनिदर्शक शद्ब, सामान्य ज्ञान .................. १५६
२१. निबंध लेखन................................................. १७१
२२. कल्पना-विस्तार.............................................. १८८
२३. सारांश लेखन................................................ २१५
२४. अपठित पद्य उताऱ्याचा अर्थ .................................. २२३
२५. वाक्प्रचार.................................................... २३३

■■■

# मराठी व्याकरण

## १

# भाषेचा जन्म, लिपी

आदिमानवाच्या काळातच भाषेचा जन्म झाला. प्राचीन काळी लोक रानावनांत डोंगरदऱ्यांत कडीकपारींतून किंवा गुहेमध्ये राहायचे. कारण पूर्वी घराची निर्मिती नव्हती. पूर्वीचे लोक शिकार करून कच्चे मांस, झाडावरची फळे, कंदमुळे, कच्चा पाला खात असत. हेच त्यांचं अन्न होतं. कारण अग्नीचा शोध लागला नव्हता म्हणून ते कच्चे मांसच खात होते.

स्त्री-पुरुष, लहान मुले हे अंग झाकण्यासाठी झाडाच्या सालीचा वापर करीत. हे लोक आपल्या उपजिविकेसाठी एकत्र आले आणि त्यांच्यामध्ये वस्तुंची देवाण-घेवाण सुरू झाली. त्यांच्यात प्रेम, द्वेष, मत्सर, राग, गर्व अशा भावना निर्माण झाल्या. आपल्या मनातील भावना एकमेकांसमोर व्यक्त करत असतानाच भाषेचा जन्म झाला.

सुरुवातीला ते हावभावाद्वारे बोलू लागले. डोळ्याने खुणावायचे, हाताने इशारे करायचे, मान हलवायचे, अशा तऱ्हेतऱ्हेच्या खुणा करीत. ही खुणांची भाषा म्हणजे **'नैसर्गिक भाषा'** होय. ही भाषा सर्व प्राणिमात्रांत आढळून येते. उदा : एखादी गोष्ट नाकारायची असेल तर मान हलवून सांगणे.

'भाष' या संस्कृत धातूपासून भाषा हा शद्ब बनला आहे. भाष म्हणजे बोलणे किंवा बोलण्याचा व्यवहार करणे असा आहे. काही वेळा आपण आपले विचार लिहून मांडतो. आपण आपल्या निरनिराळ्या ध्वनीच्या ज्या सांकेतिक खुणा ठरविल्या आहेत. त्या खुणांनी आपण आपले लेखन करतो. त्याला **लिपी** असे म्हणतात व त्यातील प्रत्येक खुणेला **अक्षर** असे म्हणतात. आपले बोलणे हे लिपीत लिहून ठेवल्याने ते नष्ट न पावणारे असते म्हणून त्याला **अक्षर** असे म्हणतात. क्षर म्हणजे नष्ट न पावणारे, अजिबात नष्ट न पावणारे, अक्षर

**लिपी :** लीप याचा अर्थ लिंपणे, सारवणे, माखणे असाही होतो. कागदावर पेनाने माखणे, शाईने कागदावर लिपतो म्हणून ती **लिपी** होय. पूर्वी दगडावर, ताम्रपटावर लिंपले जात होते. आपण जी लिपी वापरतो ती बालबोध लिपी. हिलाच **'देवनागरी लिपी'** असे म्हणतात. ही लिपी आर्य लोकांची आहे. त्यांच्यामुळेच ही लिपी भारतात आली. आर्य हे

वर्णाने गोरे व तेजस्वी होते. म्हणून लोक त्यांना 'देव' मानत. हेच आर्य नगरात म्हणजे शहरात राहात असल्यामुळे त्यांच्या लिपीला 'देवनागरी लिपी' हे नाव पडले. या लिपीमध्ये संस्कृत, मराठी, गुजराथी, हिंदी भाषा मोडतात.

देवनागरी लिपी ही जलद गतीने लिहिता यावी म्हणून त्यांतील अक्षरे मोडून किंवा त्यांना थोडी मुरड घालून लिहिण्याची पद्धत म्हणजे **'मोडी लिपी'** होय. मोडीत सर्वांना भराभर लिहिता येते. आपल्या भारतात सुमारे वीस प्रमुख भाषा आहेत. जवळजवळ चारशे बोलीभाषा आहेत. आपली भाषा मराठी आहे. महाराष्ट्राबरोबर इतर प्रांतांत, विदेशांतही अनेक ठिकाणी लक्षावधी लोक मराठी भाषा बोलतात. महाराष्ट्रामध्ये नित्य मराठी भाषाच वापरली जाते. त्यासाठी मराठी भाषेबरोबरच मराठी व्याकरणाचाही अभ्यास केला पाहिजे.

## मराठी व्याकरणाचा श्रीगणेशा

आधुनिक काळात मराठी व्याकरणाचा अभ्यास अनेकांनी केला आहे. प्रत्येक लेखकांनी आपापल्या पद्धतीने व्याकरणाचा अभ्यास करून काही निष्कर्ष काढले आहेत. मराठी व्याकरणाचा अभ्यास करणारे मराठी लेखक होते; पण त्यांच्यापेक्षा शास्त्रशुद्धपणे अभ्यास करणारे इंग्रजी अभ्यासकही होते. आधुनिक काळात मराठीचे व्याकरणा विषयीचे पहिले पुस्तक कोणी लिहिले असेल तर ते एका इंग्रजी अभ्यासकाने होय. मराठी व्याकरणाचे पुस्तक एका इंग्रजी अभ्यासकाने लिहिण्याचे कारण म्हणजे त्या काळी तेच लोक भाषांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करीत होते.

१८०५ मध्ये 'विल्यम कॅरी' या अभ्यासकाने **'द ग्रामर ऑफ मराठा लँग्वेज'** हे पहिले पुस्तक लिहिले. हे पुस्तक श्रीरामपूर येथून प्रकाशित झाले. म्हणजेच मराठी भाषेचे पहिले पुस्तक इंग्रजीत होते. पुढे १८३६ मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मराठी भाषेच्या व्याकरणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून **'महाराष्ट्र भाषेचे व्याकरण'** या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. हे पुस्तक म्हणजे मराठी व्याकरणाची गुरुकिल्ली होय.

दादोबा पांडुरंग तर्खडकरांनी मराठी भाषेत विविध विषयांची शालेय पुस्तके लिहिली. पण ती पुस्तके भाषेच्या व व्याकरणाच्या दृष्टीने तपासण्याचे काम व ते दुरुस्तीचे काम मेजर कँडी या इंग्रज अधिकाऱ्याने केले. अनेक मराठी विचारवंतांनी मेजर कँडीसाहेबा विषयी गौरवोद्‌गार काढले आहेत. त्यानंतरच्या काळात मराठी व्याकरणावर आणि व्याकरणातील विविध प्रश्नांवर चर्चा करणारी पुस्तके विद्वानांनी लिहिली.

१९११ मध्ये मोरो केशव दामले (केशवसुतांचे बंधू) यांनी 'शास्त्रीय मराठी व्याकरण' हा ग्रंथ लिहिला. त्यांनी आपल्या या ग्रंथात आधीच्या विविध अभ्यासकांच्या विचारांचा व मतांचा परामर्श घेऊन व्याकरणाचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून शोध घेतला.

## व्याकरणाची गरज

आपल्याला मराठी भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास करायचा आहे. प्रथम भाषा ज्या घटकांनी बनली; प्रथम त्यांचा अभ्यास केला पाहिजे. मराठी भाषा एक असली तरी बारा कोसांवर बोलीभाषा बदलते. मराठवाडा, खानदेश, कोकण, विदर्भ, महाराष्ट्र अशा वेगवेगळ्या भागात मराठीची वेगवेगळी रूपे पाहायला मिळतात. कोकणी, वऱ्हाडी, अहिराणी या देखील बोलीभाषाच आहेत. तेथील शब्दोच्चार, वाक्प्रचार, वाक्यरचना, शब्दार्थ यामध्येही लहान मोठे फरक आढळतात. त्यामुळेच भाषेत फरक पडतो.

व्याकरणाचा अभ्यास कसा करावयाचा ? भाषा ही असंख्य वाक्यांनी व्यक्त होते. वाक्य हे शब्दांपासून बनते. शब्द हे वर्णाक्षरांपासून तयार होतो. म्हणजे व्याकरणात वर्ण, वाक्य, शब्द, वर्णमाला या सर्वांचा अभ्यास क्रमाक्रमाने शास्त्रशुद्धपणे केला पाहिजे. मराठी भाषिकाला गद्यलेखन व काव्य यांचे आकलन येण्यासाठी व्याकरणाचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

'भाषेची देवाण-घेवाण म्हणजे भाषेचा व्यवहार व्यवस्थित रीतीने चालावा यासाठी काही नियम ठरविण्यात आले आहेत. या नियमांनाच **'व्याकरण'** असे म्हणतात. व्याकरणामध्ये अनेक बारीक-सारीक गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. शब्दाच्या जाती किती ? शब्द कसे बनतात ? वाक्य म्हणजे काय ? वाक्याचे घटक कोणते ? लिंगपद्धती कशी आहे ? वाक्यातील शब्दांचा परस्परांशी कोणता संबंध असतो ? या सर्वांचा अभ्यास व्याकरणात केलेला असतो. व्याकरण हा शब्द (वि + आ + कृ = करण) पासून बनलेला आहे. म्हणजे व्याकरणाचा अर्थ स्पष्टीकरण असा होतो.

'भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र म्हणजे व्याकरण होय. आपण जे बोलतो किंवा लिहितो ते नीटनेटके व्यवस्थित आकर्षक व शुद्ध असावे याकरिता व्याकरणाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. या अभ्यासासाठी वेगवेगळ्या विचारांचा अभ्यास केला पाहिजे. उदा. वर्णविचार, शब्दविचार, लिंगविचार, वाक्यविचार हे विचारच व्याकरणाचा महत्त्वाचा पाया आहे.

## अभ्यास

१. व्याकरण म्हणजे काय ? व त्याचे महत्त्व सांगा.
२. लिपी कशास म्हणतात ? लिपीचे प्रकार कोणते ?
३. मराठी व्याकरण शिकायचे म्हणजे कोणत्या गोष्टी शिकाव्या लागतील ?
४. मोडी लिपी व देवनागरी लिपींतील फरक सांगा ?
५. मराठी व्याकरणाचा श्रीगणेशा केव्हा व कसा झाला ?
६. भाषा व लिपी हे शब्द कसे तयार झाले ?

■■■

२

# वर्ण विचार

प्रत्येक शब्द हा पुऱ्या अर्थाचा असला तर त्यास वाक्य असे म्हणतात. वाक्ये ही शब्दापासून बनतात. शब्द हे वर्णापासून तयार होता. म्हणून मराठी व्याकरणात वर्णविचाराचा अभ्यास महत्त्वाचा आहे. 'ठराविक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहाला काही अर्थ प्राप्त झाल्यास त्यास 'शब्द' असे म्हणतात. आपण दररोज बोलताना अनेक शब्दांचा उपयोग करतो. कोणत्याही भाषेत बोलताना आपण अनेक वाक्ये वापरतो. अनेक शब्दांच्या समुच्चयाने आपण एक विचार पूर्णपणे व्यक्त करतो.

मराठी हा शब्द आहे. म, रा, ठी अशा तीन अक्षरांचा समूह बनून मराठी हा शब्द तयार झाला. 'म' हा मूलध्वनी नव्हे. 'म' या अक्षरात म् व अ् हे दोन मूलध्वनी आहेत. **'तोंडावाटे निघणारे मूलध्वनी म्हणजे वर्ण होय**, वर्ण याचा अर्थ रंग असा होतो. पण व्याकरण दृष्ट्या वर्ण म्हणजे आपल्या मुखातून जे ध्वनी स्पष्टपणे प्रकट होतात. त्या मूलध्वनीस **वर्ण** असे म्हणतात.

मराठीत एकूण ४८ वर्ण आहेत. या अठ्ठेचाळीस वर्णांच्या मालिकेला **'वर्णमाला'** किंवा **मुळाक्षरे** म्हणतात. अक्षरांना आपण ध्वनिचिन्हे असेही म्हणतो. लिहून ठेवल्यामुळे हे ध्वनी नाश न पावता कायमचे राहतात. म्हणून त्यांना **'अक्षर'** असे म्हणतात.

## ■ मराठीतील वर्णमाला

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ

ए, ऐ, ओ, औ, अं, अः

क, ख, ग, घ, ङ, च, छ्

ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण

त, थ, द, ध्, न, प, फ, ब, भ, म

य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ.

पहिल्या इयत्तेत अंकलिपीमध्ये पहिल्या पानावरच मुळाक्षरे असतात. प्रथम मुलांना मुळाक्षरे अर्थात वर्णमाला शिकवली जाते. अ, आ, इ, र, प हे उच्चार आहेत. त्यांची ही लिखित चिन्हे म्हणजे वर्ण होय.

'श्याम शाळेत जातो.' हे वाक्य आहे. या वाक्यात तीन शब्द आहेत. १) श्याम २) शाळेत ३) जातो. यात एकूण सात अक्षरे आहेत. शा,म,शा,ळे,त,जा,तो. यात मूलध्वनी १४ आहेत.

शा (श् + आ) म (म् + अ) शा (श् + आ) ळे (ळ् + ए)

त (त् + अ) जा (ज् + आ) तो (त + ओ)

असे एकूण १४ मूलध्वनी या वाक्यात आढळतात.

## ■ वर्णांचे प्रकार

१) स्वर, २) स्वरादी, ३) व्यंजन

**१. स्वर :** 'स्व' म्हणजे उच्चार करणे. स्वर म्हणजेच एक अर्थ स्वर असाही होतो. अ,आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ॠ , ए, ऐ, ओ, औ असे १२ स्वर आहेत.

स्वरांचा उच्चार हा ओठांच्या व जिभेच्या विविध हालचालीतून होतो. एखाद्या वर्णाचा उच्चार आपोआपही होतो. त्यांच्या उच्चारासाठी दुसऱ्या कशाची गरज भासत नाही.

जीभ, दात, ओठ यांचा एकमेकांशी स्पर्श न करता विविध हालचालीतून जे ध्वनी आपल्या तोंडावाटे बाहेर पडतात. त्यांना **'स्वर'** असे म्हणतात. स्वर उच्चारताना आपले तोंड उघडे असल्यामुळे स्वराचा उच्चार सहज होतो.

## ■ स्वरांचे प्रकार

**१. ऱ्हस्व स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार करताना अल्पकाळ लागतो. ते ऱ्हस्व स्वर होय. (अ, इ, उ, ऋ, लृ हे ऱ्हस्व स्वर) आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ या स्वरांचा उच्चार करायला अधिक वेळ लागतो.

**२. दीर्घ स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार करताना अधिक वेळ लागतो. ते दीर्घ स्वर होय. (आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ हे दीर्घ स्वर) आहेत. हे उच्चारताना खूप वेळ लागतो.

**३. संयुक्त स्वर :** ज्या स्वरांचा उच्चार स्पष्टपणे मोकळा व स्वयंपूर्ण असून तो दोन स्वरांच्या जुळणीने, संयोगाने होतो. त्यास संयुक्त स्वर म्हणतात. उदा : अ + ई ऐ, ए, ओ, औ हे संयुक्त स्वर आहेत.

**४. सजातीय स्वर :** एकसारख्या उच्चार स्थानातून निघणारे स्वर म्हणजे सजातीय स्वर होय. उदा : अ-आ, इ-ई, उ-ऊ, ऋ-ॠ.

**५. विजातीय स्वर :** वेगळ्या किंवा भिन्न उच्चार स्थानापासून निघणारे स्वर म्हणजे विजातीय स्वर होय. उदा : अ-आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ओ, औ.

## ■ स्वरादी

स्वर आहे आधी ज्यात तो स्वरादी. अ व आ या ध्वनीचा उच्चार स्वराचा आधार घेऊनच केला जातो. त्यास **'स्वरादी'** म्हणतात. यात अनुस्वार ( ं ) व विसर्ग (:) असे दोन उच्चार आहेत.

## स्वरादीचे प्रकार

**१. अनुस्वार ( ं ) :** . या चिन्हाला अनुस्वार म्हणतात. या चिन्हाला व्याकरणामध्ये बिंदू असेही म्हणतात. अनुस्वार हा लिहून दाखविताना त्याच्यामागे असलेल्या वर्णाच्या डोक्यावर एक टिंब ठेवून दाखविला जातो. उदा. : गं, अं, मं, तं, जं इ.

अनुस्वारामध्ये नाकातून केलेल्या बिंदूच्या अस्पष्ट उच्चाराला अनुनासिक म्हणतात. एखाद्याचे सांगणे आपण ऐकून ते पटत असल्याचे दर्शविण्यासाठी हं, हां असे उद्गार काढून बिंदूचा उच्चार अनुनासिकासारखा होतो.

उदा. : लोकांत, आकांत, देवांनी इ.

**२. विसर्ग (:) :** विसर्गाचा अर्थ श्वास सोडणे असा होतो. एखाद्या वर्णासमोर (:) अशी टिंबे देऊन 'ह' प्रमाणे उच्चार होतो. त्यास **'विसर्ग'** असे म्हणतात. विसर्गाच्या आधी आलेल्या स्वराला धरून त्याला अनुरूप 'ह' या वर्णाला थोडा जोर देऊन उच्चार करतात. उदा : उषःकाल, दुःख, निःस्पृह, अंतःकरण इत्यादी.

## व्यंजने

वर्णमालेतील क, ख पासून ह, ळ पर्यंतचे वर्ण असे आहेत की, त्यांचा उच्चार स्वतंत्रपणे करता येत नाही. म्हणजेच याचा उच्चार पूर्ण करण्यासाठी 'अ' या स्वराचे साहाय्य घ्यावे लागते. अशा वर्णांना **व्यंजने** म्हणतात. (वि + अज्ज् = व्यक्त करणे)

जे वर्ण पाय मोडून लिहितात. उदा (क्, ट्, प्, ह्, र्, श्)  पण व्यवहारात यांना 'अ' हा स्वर मिसळला जातो. उदा. (क, ट, प, र, ह) अशा व्यंजनांना **'स्वरान्त'** असे म्हणतात. व्यंजनाचा उच्चार करताना तोंड बंद असते. म्हणजे हवेचा मार्ग जीभ किंवा ओठ याने अडविलेला असतो.

### व्यंजनाचे प्रकार

**१. स्पर्श व्यंजन :** ज्या व्यंजनाचा उच्चार होताना घशातून येणारी हवा ही दात, कंठ, तालू, ओठ यांना स्पर्श करते म्हणून याला स्पर्श व्यंजन म्हणतात.

क, ख, पासून भ, म पर्यंत सर्व व्यंजने स्पर्श व्यंजने आहेत. त्यांची पाच वर्गात विभागणी होते. प्रत्येक वर्गात पाच-पाच व्यंजने असतात व त्यातील प्रत्येक पाचवे व्यंजन नाकातून उच्चारले जाते.

**२. कठोर व मृदू व्यंजन :** क, ख, च, छ, ट, इ, त, थ, फ ही कठोर व्यंजने होय. तर ग्, घ्, ज्, झ्, ड्, ढ्, ध्, ब्, भ् ही मृदू व्यंजने होय. पाच वर्गांतील व्यंजनांच्या उच्चारावरून त्यांची कठोर व मृदू व्यंजने अशी विभागणी होते. जिथे उच्चाराची तीव्रता असते. ते कठोर व्यंजन. जेथे उच्चारांची सौम्यता किंवा मृदूता असते त्यास मृदू व्यंजन म्हणतात.

**३. महाप्राण व्यंजन :** ज्या वर्णाच्या उच्चारात 'ह' सारखा उच्चार असतो त्यांना महाप्राण व्यंजन म्हणतात. उदा. : ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, घ, फ, भ या वर्णात 'ह' या उच्चाराची छटा असल्यामुळे या व्यंजनास 'महाप्राण' असे म्हणतात.

**४. अल्पप्रमाण व्यंजन :** या वर्णाचा 'ह' सारखा उच्चार नसतो. म्हणजे महाप्राण व्यंजन सोडून बाकीचे सगळे अल्पप्रमाण व्यंजन होय.

**५. अर्ध स्वर-व्यंजन :** य, र, ल, व यांची उच्चार स्थाने अनुक्रमे इ,उ,लृ या स्वरांच्या उच्चार स्थानांप्रमाणे आहेत म्हणून संधी करताना या वर्णाची अदलाबदल होऊ शकते.

उदा. : पितृ + आज्ञा = पित्राज्ञा (लृ + आ)

मनु + अंतर = मन्वंतर ( उ - व)

अति + आनंद = अत्यानंद (इ - य)

स्पर्श व्यंजन व उष्मे व्यंजन याच्यामधील येणाऱ्या वर्ण येतात त्यास अर्ध स्वर किंवा 'अंतस्थ' व्यंजन असे म्हणतात.

पाच वर्गातील वर सांगितलेले दहा वर्ण अधिक हे चार वर्ण दोन्ही मिळून १४ महाप्राण वर्ण मानले जातात तर २० अल्पप्राण वर्ण मानले जातात. वेदकालीन काळात संस्कृत 'ळ्' वर्ण मानला जात असे. नंतरच्या संस्कृत साहित्यात 'ळ' हा वर्ण नाही.

प्रत्येक व्यंजनात अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ हे दहा स्वर व अं, अ: हे दोन स्वरादी यांची चिन्हे एकत्र करून बारा अक्षरे तयार होतात. त्या अक्षरांना बाराखडी म्हणतात.

'क'ची बाराखडी अशी तयार होते.

| वर्ण | चिन्हे | बाराखडी |
|---|---|---|
| अ | | क |
| आ | ा | का |
| इ | ि | कि |
| ई | ी | की |
| उ | ु | कु |
| ऊ | ू | कू |
| ए | े | के |
| ऐ | ै | कै |
| ओ | ो | को |
| औ | ौ | कौ |
| अं | ं | कं |
| अ: | : | क: |